ePaper

भारताची 'सिंधू' पाणी वाटप कराराला स्थगिती; पाकिस्तानचा थयथयाट

| वर्ष - 8 | अंक - 268 | UDYAM-MH-26-0158827 |



महाईन्यूज ™

आतील पानांत

- तू माझ्यासारखा नाही खेळू शकत!
- पंजाब-केकेआर सामना पावसामुळे रद्द
- अभिनेत्री शिरीन मिर्झाने गुडन्यूज दिली!
- पाणी अडविण्यासाठी व्यवस्था नाही!

www.mahaenews.com | रविवार, दि. 27 एप्रिल 2025 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

## अमेरिका, इस्रायलची भारताला प्रचंड मदत...

# पाकशी युद्ध झालेच तर, भारताची ताकद किती ?

## भारताची युद्ध सज्जता पूर्ण, पुढील 48 तासात पाकिस्तानवर कठोर कारवाई ?









। मुंबई / नवी दिल्ली । महाईन्यूज

**'इस्लामिक दहशतवादा' विरुद्ध लढण्यासाठी भारतीय सुरक्षा यंत्रणा पूर्णपणे सज्ज झाली आहे. पाकिस्तान विरोधात कारवाई करण्यासाठी अमेरिका आणि इस्रायल यांनी प्रचंड ताकद पुरवण्याचे आश्वासन भारताला दिले आहे. येत्या ४८ तासात कोणत्याही क्षणी पाकिस्तानवर कठोर कारवाई होण्याची शक्यता आहे आणि युद्ध झाले तर भारताची ताकद किती ? याचा आढावा भारतीय अधिकाऱ्यांनी घेतला.**

जगातील अनेक आंतरराष्ट्रीय विश्लेषकांनी भारताच्या युद्ध सज्जतेवर प्रकाश टाकला असून येत्या ४८ तासात कोणत्याही क्षणी पाकिस्तानवर भारताकडून कठोर कारवाई केली जाण्याचे संकेत आहेत.

### भारताची तिन्ही दले तयार : लक्ष आदेशाकडे !

भारताचे गृहमंत्री, संरक्षणमंत्री, परराष्ट्रमंत्री आणि तीन दलाचे प्रमुख गेले तीन दिवस वेगवेगळ्या रणनीती आखण्यात मग्न असून भारताची संपूर्ण यंत्रणा सज्ज असल्याचे त्यांनी वरिष्ठांना कळवले आहेत. भारताची ताकद वाढवण्यासाठी अमेरिका आणि इस्रायल देखील पुढे सरसावले आहे.

### पुढील दोन दिवस महत्त्वाचे!

संपूर्ण जगातील युद्धनीतीतज्ज्ञ, तसेच प्रसिद्ध संरक्षण विश्लेषकांचे ठाम मत आहे की पुढील दोन दिवसात भारताकडून मोठी कारवाई होण्याची शक्यता आहे. त्यासाठी भारताने पाकिस्तानच्या नागरिकांना त्यांच्या देशात परत जाण्यासाठी मुदत दिली आहे. पाकिस्तानातील दुतावासातील सर्व भारतीय कर्मचाऱ्यांना पुन्हा भारतात बोलवण्यात आले आहे.

### भारतापुढे तीन मोठे पर्याय..

पाकिस्तानवर मोठी कारवाई करायची असल्यास भारतापुढे तीन मोठे पर्याय आहेत, असे तज्ज्ञांचे मत आहे. पहिला पर्याय क्षेपणास्त्राने हवाई हल्ला करणे. ओ. आर. एफ. चे विवेक मिश्रा यांच्या म्हणण्यानुसार सीमेपलीकडे असलेले दहशतवादी लपण्याच्या जागा आणि लष्करी छावण्यांचे अचूक निर्देशांक निश्चित करून क्षेपणास्त्र हल्ले केले जाऊ शकतात. दुसरा पर्याय आहे ड्रोन हल्ल्याचा ! हल्ली ज्यावेळी विजय निश्चित असतो, त्याचवेळी सैनिक पाठवले जातात. सध्याच्या परिस्थितीत शक्तिशाली इलेक्ट्रॉनिक उपकरणे आणि मानवरहित ड्रोन च्या मदतीने शत्रूच्या लक्ष्यांवर हल्ले केले जातील. दहशतवाद्यांच्या अड्ड्यांवर मानवरहित ड्रोन द्वारे भारत हल्ले चढवू शकतो.

### जमीन किंवा समुद्रातून हल्ले..

भारताने पाकिस्तानच्या सीमेवर गस्त आणि देखरेख वाढवली आहे. राजस्थानच्या सीमावर्ती भागातही सतर्कता आहे. सीमावर्ती भागात सशस्त्र सैनिक तैनात करण्यात आले असून उरीसारखा 'सर्जिकल स्ट्राईक' देखील होऊ शकतो. उरी हल्ल्यात भारताने नियंत्रण रेषा ओलांडली आणि दहशतवाद्यांचे अड्डे उद्ध्वस्त केले, तो पर्याय चांगला मानला जात आहे. भारताने अरबी समुद्रात गेल्या दोन दिवसात युद्धनौका पाठवून क्षेपणास्त्रांच्या यशस्वी चाचण्याही केल्या आहेत.

### क्षेपणास्त्रे हादरवणारी..

भारताकडे क्षेपणास्त्रांचा मोठा साठा आहे. अग्नि-1, अग्नि -5 पृथ्वी-2, पृथ्वी-3 ब्रह्मोस ही क्षेपणास्त्रे आहेत. सुखोई आणि राफेल या लढाऊ विमानांच्या मदतीने डागता येतात. के- 4, के-15, सागरिकासारखी 'के' सीरिज मधील क्षेपणास्त्रे पाणबुड्यांवरून डागता येतात. त्याचा पुरेपूर फायदा भारत घेऊ शकतो.

### अमेरिका उतरली पाकिस्तानच्या बाजूने.. दिली भारतावर डागण्यासाठी क्षेपणास्त्रे!

आंतरराष्ट्रीय स्तरावर एकाकी पडलेल्या पाकिस्तानच्या मदतीला अखेर चीन धावून आला आहे. चीनने सवयीप्रमाणे आपले खरे रंग दाखवले आहेत. चीनने पाकिस्तानला शंभरपेक्षा जास्त 'PL-15 लॉन्ग रेंज एअर टू एअर' हल्ला करु शकणारी (VLRAAM) क्षेपणास्त्रे दिली आहेत. या क्षेपणास्त्रांची रेंज दोनशे किलोमीटर आहे. पाकिस्तानी एअरफोर्सने PL-15 एयर-टू-एयर मिसाइल (VLRAAM) JF-17 थंडर ब्लॉक-3 मध्ये फिट केले आहे. विंग टिप्सवर PL-10E WVRM HOBS सक्षम मिसाइल दिसत आहे.

# वैद्यकीय शिक्षणाच्या 75 हजार जागा वाढविणार!

## सध्या 30 हजार आयुष्मान आरोग्य मंदिर : जे. पी. नड्डा

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**'भारतामध्ये वैद्यकीय शिक्षण घेतलेले विद्यार्थी परदेशामध्ये सेवा देतात, असे चित्र आहे. त्यामुळे देशाला अधिक संख्येने डॉक्टर मिळावेत यासाठी पुढील पाच वर्षांत वैद्यकीय पदवी आणि पदव्युत्तर पदवी शिक्षणाच्या ७५ हजार जागा वाढविल्या जाणार आहेत', असे प्रतिपादन केंद्रीय आरोग्यमंत्री जे. पी. नड्डा यांनी शनिवारी केले. 'प्राथमिक शिक्षण हा मूलभूत हक्क आहे. व्यावसायिक शिक्षण हे व्यक्तिगत फायद्याचे आहे.**



त्यामुळे समाजाला परत करणे हे तुमचे उत्तरदायीत्व असले पाहिजे', अशी अपेक्षा नड्डा यांनी व्यक्त केली.लवळे येथील सिम्बायोसिस रुग्णालय व संशोधन केंद्राच्या मूत्रपिंड (नेफ्रोलॉजी) आणि मूत्रविकार (युरोलॉजी) केंद्राचे उद्घाटन जेप पी. नड्डा यांच्या हस्ते करण्यात आले. त्याप्रसंगी नड्डा बोलत होते. सिम्बायोसिस आंतरराष्ट्रीय विद्यापीठाचे कुलपती डॉ. शां. ब. मुजुमदार, प्र-कुलपती डॉ. विद्या येरवडेकर, वैद्यकीय आणि आरोग्य विज्ञान विद्याशाखेचे प्रमुख डॉ. राजीव येरवडेकर या वेळी उपस्थित होते. नड्डा म्हणाले, 'राष्ट्रीय गुणवत्ता आश्वासन मानकांनुसार (एनडब्ल्यूएएस) सध्या ३० हजार आयुष्मान आरोग्य मंदिर आहेत आणि आमचे लक्ष्य हे लवकरच १ लाख ७५ हजार आयुष्मान आरोग्य मंदिरे निर्माण करण्याचे आहे जेणेकरून सर्वसमावेशक प्राथमिक आरोग्य सेवा प्रदान करता येईल. याद्वारे लोकांच्या आरोग्यावर लक्ष केंद्रित करण्याबरोबरच विस्तारित आरोग्य सेवा देण्यात येईल.

''प्रत्येक गोष्ट मोफत देणे शक्य नाही परंतु सिम्बायोसिस आरोग्यधाममध्ये त्यांनी ते शक्य केले आहे. महिलांसाठी महाविद्यालय ही उत्तम गोष्ट साकारली आहे. सध्या हे केंद्र स्वरूपात असले तरी भविष्यात ही संस्था होईल. सिम्बायोसिस सारख्या संस्था आणि सरकार यांनी एकत्र येऊन आरोग्य क्षेत्रात सर्वसमावेशक स्वरूपाची धोरणे तयार करावीत', अशी अपेक्षा नड्डा यांनी व्यक्त केली. डॉ. मुजुमदार, डॉ. विद्या येरवडेकर आणि डॉ. राजीव येरवडेकर यांनी मनोगत व्यक्त केले.

### प्रत्येक गोष्ट मोफत देणे शक्य नाही

नड्डा म्हणाले, 'राष्ट्रीय गुणवत्ता आश्वासन मानकांनुसार (एनडब्ल्यूएएस) सध्या ३० हजार आयुष्मान आरोग्य मंदिर आहेत आणि आमचे लक्ष्य हे लवकरच १ लाख ७५ हजार आयुष्मान आरोग्य मंदिरे निर्माण करण्याचे आहे जेणेकरून सर्वसमावेशक प्राथमिक आरोग्य सेवा प्रदान करता येईल. याद्वारे लोकांच्या आरोग्यावर लक्ष केंद्रित करण्याबरोबरच विस्तारित आरोग्य सेवा देण्यात येईल.''प्रत्येक गोष्ट मोफत देणे शक्य नाही परंतु सिम्बायोसिस आरोग्यधाममध्ये त्यांनी ते शक्य केले आहे. महिलांसाठी महाविद्यालय ही उत्तम गोष्ट साकारली आहे. सध्या हे केंद्र स्वरूपात असले तरी भविष्यात ही संस्था होईल. सिम्बायोसिस सारख्या संस्था आणि सरकार यांनी एकत्र येऊन आरोग्य क्षेत्रात सर्वसमावेशक स्वरूपाची धोरणे तयार करावीत', अशी अपेक्षा नड्डा यांनी व्यक्त केली. डॉ. मुजुमदार, डॉ. विद्या येरवडेकर आणि डॉ. राजीव येरवडेकर यांनी मनोगत व्यक्त केले.

अनेक वर्षे या देशात एकच भारतीय आयुर्विज्ञान संस्था (एम्स) होती. अटलबिहारी वाजपेयी यांनी पाच एम्स सुरू केल्या. तर, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या कालखंडात गेल्या दहा वर्षांत १६ एम्स सुरू झाल्या आहेत. समाजाला परत करणे हे तुमचे उत्तरदायीत्व असले पाहिजे', अशी अपेक्षा नड्डा यांनी व्यक्त केली.लवळे येथील सिम्बायोसिस रुग्णालय व संशोधन केंद्राच्या मूत्रपिंड (नेफ्रोलॉजी) आणि मूत्रविकार (युरोलॉजी) केंद्राचे उद्घाटन जेप पी. नड्डा यांच्या हस्ते करण्यात आरोग्य विज्ञान विद्याशाखेचे प्रमुख डॉ. राजीव येरवडेकर या वेळी उपस्थित होते.

# पावसाळापूर्व कामांसाठी ६१ रस्त्यांवर परवानगी

## काही काळ वाहतूक बंद ठेवण्यास वाहतूक पोलिसांची मान्यता

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पावसाळापूर्व कामे करण्यासाठी महापालिका प्रशासनाने वाहतूक पोलिसांकडे शहरातील रस्ते काही काळ बंद ठेवण्याची परवानगी मागितली होती. त्यानुसार, पोलिसांनी ६१ ठिकाणी कामे करण्याची परवानगी दिली असल्याने हे रस्ते अल्प काळासाठी बंद राहणार आहेत. शहरात पावसाळ्यात पाणी साचणारी २०१ ठिकाणे महापालिकेने शोधली आहेत.**



यंदाच्या पावसाळ्यात तेथे पाणी साचून राहू नये, यासाठी आवश्यक ते नियोजन महापालिकेने केले आहे. या ठिकाणांमध्ये शहरांतील विविध भागांचा समावेश आहे. पुढील एका महिन्यात ही सर्व कामे पूर्ण करणे आवश्यक असल्याने महापालिकेने वाहतूक पोलिसांकडे 'ना हरकत प्रमाणपत्र' (एनओसी), तसेच ६३ रस्त्यांचा प्रस्ताव पाठवून काम करण्यास मान्यता मागितली होती. त्यांपैकी ६१ ठिकाणी काम करण्यासाठी वाहतूक पोलिसांनी मान्यता दिल्याचे महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त पृथ्वीराज बी. पी. यांनी सांगितले.पोलिसांनी 'एनओसी' दिल्याने लवकरच या कामांना सुरुवात होणार आहे.

गेल्या काही वर्षांत कमी वेळात अधिक पाऊस पडून रस्त्यावर मोठ्या प्रमाणात पाणी साचते. त्यामुळे वाहतुकीची कोंडी होते. यंदा हे टाळण्यासाठी महापालिकेने तयारी सुरू केली आहे. राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन योजनेंतर्गत शहरात २३ ठिकाणी पावसाळापूर्व कामे केली जाणार आहेत. त्यासाठी २१ ठिकाणी रस्ते खोदाई करावी लागणार आहे. त्यामुळे या रस्त्यावरील वाहतुकीचे नियोजन करावे लागणार आहे. पोलिसांनी ही कामे करण्यास तत्वतः परवानगी दिली आहे. पोलिसांनी सिंहगड रस्त्यावरील रांका ज्वेलर्सजवळ आणि वैभव टॉकीजजवळ खोदाईची परवानगी नाकारली आहे.

येथे काम करण्यासाठी परवानगी देताना संबंधित कनिष्ठ अभियंता, काम करणारा ठेकेदार यांचा जबाब घेऊन महापालिकेच्या जबाबदारीवर ही परवानगी देण्याचा निर्णय वाहतूक पोलिसांनी घेतला आहे.यंदाच्या पावसाळ्यात तेथे पाणी साचून राहू नये, यासाठी आवश्यक ते नियोजन महापालिकेने केले आहे. या ठिकाणांमध्ये शहरांतील विविध भागांचा समावेश आहे. पुढील एका महिन्यात ही सर्व कामे पूर्ण करणे आवश्यक असल्याने महापालिकेने वाहतूक पोलिसांकडे 'ना हरकत प्रमाणपत्र' (एनओसी), तसेच ६३ रस्त्यांचा प्रस्ताव पाठवून काम करण्यास मान्यता मागितली होती.

त्यांपैकी ६१ ठिकाणी काम करण्यासाठी वाहतूक पोलिसांनी मान्यता दिल्याचे महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त पृथ्वीराज बी. पी. यांनी सांगितले.

पोलिसांनी 'एनओसी' दिल्याने लवकरच या कामांना सुरुवात होणार आहे. गेल्या काही वर्षांत कमी वेळात अधिक पाऊस पडून रस्त्यावर मोठ्या प्रमाणात पाणी साचते.

त्यामुळे वाहतुकीची कोंडी होते. यंदा हे टाळण्यासाठी महापालिकेने तयारी सुरू केली आहे. राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन योजनेंतर्गत शहरात २३ ठिकाणी पावसाळापूर्व कामे केली जाणार आहेत. त्यासाठी २१ ठिकाणी रस्ते खोदाई करावी लागणार आहे. त्यामुळे या रस्त्यावरील वाहतुकीचे नियोजन करावे लागणार आहे. पोलिसांनी ही कामे करण्यास तत्वतः परवानगी दिली आहे.

### खोदाईची परवानगी नाकारली

पोलिसांनी सिंहगड रस्त्यावरील रांका ज्वेलर्सजवळ आणि वैभव टॉकीजजवळ खोदाईची परवानगी नाकारली आहे ठेकेदार यांचा जबाब घेऊन महापालिकेच्या जबाबदारीवर ही परवानगी देण्याचा निर्णय वाहतूक पोलिसांनी घेतला आहे.पावसाळापूर्व कामे करण्यासाठी महापालिका प्रशासनाने वाहतूक पोलिसांकडे शहरातील रस्ते काही काळ बंद ठेवण्याची परवानगी मागितली होती.

## मावळ, खेड, शिरूर तालुक्याची वाहतूक कोंडी फुटणार

# चाकणच्या वाहतूक कोंडीपासून दिलासा मिळणार!

### तळेगाव-चाकण-शिक्रापूर महामार्गाला राज्य मंत्रिमंडळाची मंजुरी

। पिंपरी-चिंचवड । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**मावळ, खेड आणि शिरूर तालुक्याच्या वाहतूक कोंडी पासून नागरिकांना दिलासा मिळणार आहे. नुकत्याच झालेल्या राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीमध्ये तळेगाव, चाकण, शिक्रापूर या महामार्गाच्या कामासाठी मंजुरी देण्यात आली आहे. या मार्गावरील अतिक्रमणे नुकतीच काढण्यात आली असून महामार्गाच्या रुंदीकरणाला सध्या कोणताही अडथळा राहिलेला नाही. त्यातच मंत्रिमंडळाच्या बैठकीत महामार्गाच्या कामासाठी मंजुरी मिळाल्यामुळे चाकण मध्ये होणारी वाहतूक कोंडी फुटणार आहे.**



तळेगाव-चाकण-शिक्रापूर या ५३ किमी राज्यमार्गावर तळेगाव ते चाकण चार पदरी उन्नत मार्ग व समांतर चार पदरी रस्ता करणे, तसेच चाकण ते शिक्रापूर मार्गावर सहा पदरी रस्ता विकसित करण्याचा निर्णय राज्य मंत्रिमंडळाने घेतला आहे. त्यासाठीच्या ४ हजार २०६ कोटी ८८ लाख रुपयांच्या खर्चाच्या तरतुदीस मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली आहे. या बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते.

तळेगाव चाकण शिक्रापूर हा रस्ता मुंबई-पुणे राष्ट्रीय महामार्ग ४८ वरील तळेगाव या ठिकाणाहून सुरु होऊन चाकण व पुढे शिक्रापूरया ठिकाणी पुणे-अहिल्यानगर महामार्गास जोडला जातो.

मुंबई-पुणे राष्ट्रीय महामार्ग ४८ आणि पुणे-छत्रपती संभाजीनगर राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ७५३ या दोन महत्त्वाच्या राष्ट्रीय महामार्गांना जोडणारा हा रस्ता पुणे शहराकरीता बाह्यवळण म्हणून उपयोगी पडणार आहे.

या मार्गामुळे अनेक ठिकाणी होत असलेली वाहतूक कोंडी दूरहोणार आहे. तसेच परिसरातील औद्योगिक विकासाला चालना मिळणार आहे.

रस्ते विकासात आवश्यक त्या ठिकाणी उड्डाणपुलासह बांधकाम केले जाणार आहे. महाराष्ट्र राज्य पायाभूत सुविधा महामंडळाच्या माध्यमातून काम बीओटी तत्त्वावर हे काम केले जाणार आहे

**तीन तालुक्यांना दिलासा**

- √ मावळ, खेड, शिरूर तालुक्यांना दिलासा
- √ वाहतूक व्यवस्था अधिक सुरळीत होईल
- √ उद्योग आणि गुंतवणूक वाढीस लागेल
- √ स्थानिकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध होतील
- √ प्रवास अधिक सुरक्षित व जलद होईल

## घरकामाच्या बहाण्याने घरफोडीचा ‘नेपाळी पॅटर्न’

### गुंगीचे औषध देऊन घरफोडी : पोलिसांकडून तिघांना अटक

। पिंपरी-चिंचवड । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**घरकामाच्या बहाण्याने घरात प्रवेश करून गुंगीचे औषध देऊन घरफोडी करणाऱ्या नेपाळी टोळीच्या तिघांना निगडी पोलिसांनी अटक केली. या टोळीने प्राधिकरण परिसरातील एका घरातून १६.२० लाख रुपयांचा ऐवज लंपास केला होता.**




**चोरीचा नेपाळी पॅटर्न**

**आरोपी भारतातील मोठ्या शहरांमध्ये घरकाम मिळवून घरमालकांचा विश्वास संपादन करीत असे. त्यानंतर संधी मिळताच गुंगीचे औषध देऊन चोरी करीत असे. गुन्ह्यानंतर लगेच नेपाळमध्ये पळून जात असे.**

> “ घर कामाला नोकर ठेवताना मालकांनी शहानिशा करणे गरजेचे आहे. वेळोवेळी पोलीस ठाण्यांना त्याबाबतची माहिती देणे महत्वाचे आहे. आपल्याकडे काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांची पार्श्वभूमी पाहणे मालकांनी टाळल्यास अनुचित घटना घडतात. वेळप्रसंगी जीवित हानी देखील होऊ शकते त्यामुळे सतर्कता महत्त्वाची आहे.
> **-स्वप्ना गोरे,** पोलीस उपायुक्त

नाने कमल बहादुर शाही, नवीन बहादुर शाही, नर बहादुर शाही (सर्व रा. नेपाळ) अशी अटक करण्यात आलेल्या आरोपींची नावे आहेत. पोलीस उपायुक्त स्वप्ना गोरे यांनी दिलेल्या माहितीनुसार, २४ नोव्हेंबर २०२४ रोजी फिर्यादी यांच्या अनुपस्थितीत घरकाम करणाऱ्या नेपाळी महिलेने फिर्यादींच्या मुलगा व सुनेला कॉफीतून गुंगीचे औषध दिले. त्यानंतर साथीदारांना बोलावून तिजोरी फोडून रोकड व दागिने चोरी केले. या प्रकरणी निगडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला. पोलीस आयुक्त विनय कुमार चौबे यांच्या आदेशानुसार तपास सुरू करण्यात आला. तपास पथकाने सीसीटीव्ही फुटेज, मोबाइल विश्लेषण आणि सोशल मीडियाच्या माध्यमातून आरोपींचा मागोवा घेतला. पाच दिवसांत नाने कमल बहादुर शाही याला हिंजवडी येथून अटक करण्यात आली. त्याच्याकडून मिळालेल्या माहितीनुसार उर्वरित आरोपींची नावे निश्चित करून त्यांचा शोध घेण्यात आला. सततच्या तांत्रिक तपासानंतर नवीन बहादुर शाही व नर बहादुर शाही यांना बंगलोर विमानतळावर पकडण्यात आले. आरोपींकडून ४.०५ लाखांचे दागिने जप्त करण्यात आले असून उर्वरित मुद्देमाल नेपाळमध्ये विकल्याचे निष्पन्न झाले आहे.

## श्रीब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराजांची प्रवचने



### संतांनीच भगवंताला सगुणात आणले

सर्वांत अर्पणभक्ती श्रेष्ठ आहे. पूजा करताना 'मी तुझा दास आहे' असे म्हणावे, म्हणजे प्रेम येते. यात लाज वाटायचे काहीच कारण नाही. आधी भगवंताचे दास व्हावे आणि मग पूजा करावी. आम्ही इतर कित्येकांचे दास होतो, आणि इतक्यांतून उरेल तेव्हा भगवंताचे दास होणार; मग पूजेत अर्पणभक्ती कशी येणार ? आपल्याला जे जे आवडते ते ते मनाने भगवंताला अर्पण करावे. इथे सर्व काही मनानेच करायचे असते. नुसते शरीराने काबाडकष्ट केले म्हणजे प्रेम येतेच असे नाही. चित्त विषयाकडे ठेवून भगवंताची सेवा करणे म्हणजे अंगचोरपणा आला. असा अंगचोरपणा करू नये. भगवंताकडे मन लागायला सगुणोपासना उत्तम होय. सर्व लोक या ना त्या रूपाने सगुणाचीच उपासना करणारे असतात. ठरलेली वेळ आणि ठरलेले साधन असावे, म्हणजे त्यामध्ये प्रेम येते. आपण ज्याची उपासना करतो तो तरी सगुणामध्येच असतो ना ? म्हणून त्यालासुद्धा मग ती सवय लागते. आपण ज्या मूर्तीची उपासना करतो त्या मूर्तीमध्ये तेज वाढत असते. ज्या मूर्तीची उपासना एखाद्या साधूने केलेली असेल त्या मूर्तीमध्ये फार तेज असते, आणि ते पुष्कळ काळ टिकते. शिवाय ते इतरांनाही उपयोगी पडते. जगाचे खरे स्वरूप कळण्यासाठी सगुण उपासनाच कारणीभूत आहे. सर्व भोग भोगून काळजी नसणे हे उपासनेचे खरे मर्म आहे. उपासनेचे तेज कसे झळकले पाहिजे ! हे तेज फार विलक्षण असते. पैशाचे किंवा विद्वत्तेचे तेज तितके नसते. ज्याच्या मागे उपासनेचा जोर आहे तोच जगात खरे काम करतो. एक बाई डोळे झाकून बसली म्हणजे तिला एक देवी दिसे. त्या बाईशी देवी बोलत असे, आणि प्रपंचातल्या वगैरे सर्व गोष्टी कशा कराव्यात हे सांगत असे. परंतु बाईने ध्यान करणे सोडून दिल्याने तिला देवी दिसणे बंद झाले. तसेच एक मुलगा डोळे झाकून बसला म्हणजे त्याला पांढरी दाढी असलेला एक साधू दिसे. कसे वागावे, काय करावे, वगैरे सर्व गोष्टी तो त्या मुलाला सांगत असे. परंतु मुलाने ध्यान करणे सोडून दिले, आणि तो दाढीवाला दिसेनासा झाला. या गोष्टींचा अर्थ असा की, आपल्याला सांभाळणाऱ्या शक्ती आपल्या मागे असतात, त्यांची उपासना आपण सोडू नये. भगवंताला सगुणामध्ये आणला हा संतांचा आपल्यावर फार मोठा उपकार आहे. संतांनी आपल्याला सांगितले की, 'ही दृश्य मूर्ती तुझी आहे, तुला हव्या असणाऱ्या सर्व वस्तू देणारा भगवंत तोच आहे.' ही जाणीव आणि कल्पना आपल्या ठिकाणी वाढत गेली तर त्यामुळे 'भगवंत दाता आहे' ही जाणीव उत्पन्न होईल. 'भगवंत दाता आहे, तो माझ्या मागे आहे, तो माझ्या सुखाचा आधार आहे, तो माझे कल्याण करणारा आहे,' ही जाणीव झाली की, जे मिळाले ते भगवंताच्या इच्छेनेच मिळाले ही भावना होऊन, आहे त्या परिस्थितीमध्ये समाधान टिकेल.

**बोधवचनः- आनंदरूप परमात्मा मिळविण्यासाठी सगुणोपासना पाहिजे.**



## 'स्टेट'मेंट

**अधिकराव दिवे-पाटील**

संस्थापक, संपादक

**पाकिस्तान पुरस्कृत 'लष्कर-ए-तोयबा' या दहशतवादी संघटनेच्या काही दहशतवाद्यांनी भारतामध्ये पहलगाम येथे २७ हिंदूंची अमानुष हत्या केली आणि त्याचे पडसाद जगभर म्हटले.**

# पहलगाम अन् अन्य हल्ल्यांमध्ये फरक काय ?



### हल्ला गांभीर्याने घ्यायला हवा !

या घटनेनंतर जगातील बहुतेक सर्व राष्ट्रांनी दहशतवाद विरोधी लढ्यात भारताच्या पाठीशी उभे राहण्याचा निर्णय घेतला आहे, त्यावेळेस त्यांनी पाकिस्तानचाही तीव्र शब्दात निषेध केला आहे. आता, प्रश्न पडतो तो भारतामधील विरोधी पक्ष नेत्यांच्या वक्तव्यांनी घातलेला धुमाकूळ !

### विरोधक हे भारतीय नाहीत का?

भारताने पाकिस्तानच्या विरोधात कधीही कारवाई केली किंवा एखादा 'सर्जिकल स्ट्राईक' केला, तर केंद्र सरकारच्या पाठीशी भक्कम उभे राहण्याऐवजी सध्या केंद्र सरकार कसे चुकले? हे पटवून देण्याचे नवीन दुकान थाटले गेले आहे. राहुल गांधी यांच्या 'मोहब्बत की दुकान' चे कधीच दिवाळी निघाले आहे.

### सर्वच 'इंडी' सदस्यांची कोल्हेकुई..

दहशतवादी हल्ल्यानंतर केंद्रातील मोदी सरकारला अडचणीत आणण्याची संधी आहे हे पाहताच, विरोधी 'इंडी' घटक पुढे सरसावले आहेत. त्यामध्ये काँग्रेस, शरद पवार गट, उबाठा गट, ममता बॅनर्जी, अखिलेश यादव, आम आदमी पार्टी या प्रमुख नेत्यांचा आणि पक्षाचा समावेश आहे. पहलगामचा हा दहशतवादी हल्ला हा ज्या वेळेस झाला, ज्या पद्धतीने झाला, ते पाहता इतर हल्ल्यांमध्ये आणि या हल्ल्यामध्ये फार मोठा फरक आहे, हे उगीचच कोल्हेकुई करणाऱ्या या सर्व नतद्रष्टांना ठणकावून सांगायची वेळ आली आहे !

### 'मोडस ऑपरेंडी' लक्षात घ्या..

हा दहशतवादी हल्ला नुसता दहशत पसरवण्यासाठी नव्हता, हे प्रथम लक्षात घ्या. त्या मागील 'मोडस ओपरेंडी' पाहा. या हल्ल्यात आणि इतर हल्ल्यात मोठा फरक आहे. इतर वेळी दहशतवाद पसरवणे, अशांतता, कायदा-सुव्यवस्था प्रश्न निर्माण करणे, अशी अनेक कारणे असतात. काही नागरिकांना पळवून नेऊन वेठीस धरण्याचे प्रकार असतात. तथापि, यावेळचा हल्ला या सगळ्या गोष्टींबरोबर आणखी एक उद्देशाने होता, हे सर्वांनी समजून घ्यायला हवे. हल्ल्याच्या वेळी पतीला मारून टाकल्याचे समजतात भगिनीने 'मला पण मारून टाक सांगितल्यावर हल्लेखोराने थेट एक निरोप.. मेसेज दिला..'तुम्हारे पीएम को जा के बोलो..' ही गोष्ट मात्र सामान्य नाही. 'इंटेल' ला दिलेले ते एक आव्हानच आहे.

### ' प्लॅन ए' नसेल..तर प्लॅन बी !

'स्लीपर सेल' काय चीज आहे हे लक्षात घ्या. सगळेजण पहेलगाममध्ये सुरक्षा व्यवस्था नसल्याचा कांगावा करत आहे. या जागेवर तुफान बंदोबस्त असता, तर त्यांनी दुसरीकडे हल्ला केला असता. हा 'स्पॉट प्लॅन' चा एक भाग असणार, जिथे त्यांना हल्ला करायचा होता..सरकारला मेसेज द्यायचा होता. पण, त्यांच्याकडे 'प्लॅन बी' निश्चितच तयार असणार. इथे जमणे शक्य नाही, असा मेसेज त्यांना गेला असता तर त्यांनी 'प्लॅन बी' अमलात आणला असता.

### हल्ला होण्याची कोणी वाट बघत नसते !

केंद्रामधील सरकार..मग ते कुठलेही असो, ते काही हल्ला व्हावा म्हणून वाट बघत बसलेले नसते. माहिती मिळवणारी 'इंटेल' असतात , ती यशस्वी होत असतात. क्वचितप्रसंगी अयशस्वी देखील होतात. 'इंटेल' यशस्वी झालेले , त्यामुळे हल्ला न करता आलेले दिवस, घटना तुमच्या आमच्या समोर येत नाहीत.

### सगळेच कसे गुप्तरीत्या चालू असते..

दुसरी गोष्ट अशी, की त्याची काही प्रेस नोट निघत नाही, की पत्रकार परिषद होत नाही, हल्ला परतवला, असे एकदा येऊन जनतेसमोर मांडले जात असते, तेव्हा, त्याआधी अनेकवेळा या कानाची खबर त्या कानाला लागू न देता अनेक कारवाया यशस्वी केलेल्या असतात.. सगळं कसं गुप्तरीत्या सुरू असते !

### अपयशी बाबींचा डांगोरा..

ज्या गोष्टींमध्ये अपयश येते , त्याचा दिंडोरा जास्त पिटला जातो, हे मात्र निश्चित! केंद्रामध्ये सरकार कुठलेही असो,
ज्याला आपण अपयश म्हणतो , तो त्या दिवशीचा, त्यांच्यासाठीचा, हल्लेखोरांसाठीचा 'सक्सेस रेट मानला जातो.

### शेवटी सगळे खापर सरकारवर..

सरकार कुठलेही असो, या मध्ये दोषी असतेच.. सरकारवरच सगळे खापर फोडले जाते. पण, केंद्रात बसलेल्या सरकारचे प्रयत्न त्या ठिकाणी वाया गेलेले असतात. कोणत्याही सरकारला सरकारला आपला 'फेल्युअर' दाखवायची हौस नसते.

### योग्य वेळी उत्तर मिळणार, कंबरडे मोडणार !

सध्या केंद्रामध्ये भाजप प्रणित एनडीए सरकार आहे. पहलगामचा हा हल्ला या सरकारने अतिशय गांभीर्याने घेतला आहे. पाकिस्तान विरुद्ध अनेक कडकपावलेही उचलली आहेत.. आणि आज ना उद्या त्यांना निश्चितपणे यश हे येणारच आहे! विरोधकांचा 'फेक नॅरेटीव्ह' चा कारखाना जोरात सुरू राहणार आहे आणि केंद्राची कोंडी करण्याचा प्रयत्न त्यांच्याकडूनही होणार आहे. ज्यांनी ज्यांनी नरेंद्र मोदी, भाजपा आणि संघ परिवाराची कूटनीती अनुभवली आहे, त्यांच्या कामाची पद्धत बघितली आहे, ते निश्चितपणे म्हणतील की याला उत्तर दिले जाईलच आणि ते अपेक्षित पद्धतीनेच दिले जाईल..'सक्सेस रेट शंभर टक्के राखण्यासाठी दिले जाईल !

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याची प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# मी शिंदेंना सांगणार, समज द्या!

## गायकवाड यांच्या वक्तव्यावरून फडणवीसांचा मोठा इशारा

। मुंबई ।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**शिवसेना (शिंदे) पक्षाचे आमदार संजय गायकवाड यांनी नुकतंच महाराष्ट्र पोलिसांबाबत एक वादग्रस्त विधान केलं होतं. त्यांच्या या विधानानंतर त्यांच्यावर जोरदार टीका झाली. 'महाराष्ट्र पोलिसांसारखं अकार्यक्षम खातं जगात नाही', असं वक्तव्य संजय गायकवाड यांनी पत्रकार परिषदेत बोलताना केलं होतं. दरम्यान, संजय गायकवाड यांच्या या विधानासंदर्भात बोलताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी थेट कारवाईचा इशारा दिला आहे. 'मी एकनाथ शिंदे यांना सांगणार आहे की त्यांना (संजय गायकवाड यांना) कडक समज द्या, अन्यथा ॲक्शन घेतली जाईल', असा सूचक इशाराच फडणवीसांनी दिला आहे.**





आमदार संजय गायकवाड यांच्या विधानासंदर्भात बोलताना देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं की, "मला असं वाटतं की पोलिसांबाबत असं बोलणं योग्य नाही. मी स्वतः या संदर्भात उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना सांगणार आहे की त्यांना कडक समज द्या. हे असं चालणार नाही, हे योग्य नाही. तरीही ते जर वारंवार असं बोलत असतील तर त्यावर ॲक्शन घेतलं जाईल", असं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं आहे.संजय गायकवाड यांना माध्यमांच्या प्रतिनिधींनी प्रश्न विचारला होता की, आमदार अर्जुन खोतकरांसह त्यांच्या मुलाला जीवे मारण्याची धमकी आली आहे. यावर संजय गायकवाड यांनी म्हटलं की, "आम्हाला धमक्या येतात. जे समाजात चांगलं काम करतात, त्यांना धमक्या येतात. पोलीसवाले काही करू शकत नाहीत. माझ्या घरची गाडी उडवण्याचा प्रयत्न केला गेला. तेव्हा पोलिसांकडून काय चौकशी झाली? काहीही चौकशी झाली नाही", असं संजय गायकवाड यांनी म्हटलं.महाराष्ट्र पोलिसांसारखं अकार्यक्षम खातं जगात कुठेही नसेल. पोलीस खातं म्हणजे शासनाने कोणताही कायदा केला की यांचा एक हप्ता वाढला. गुटखा बंदी केली की यांचा हप्ता वाढला, दारू बंदी केली की यांनी चालू करायची की लगेच त्यांचा हप्ता वाढला.

राज्यातील आणि देशातील पोलिसांनी इमानदारीने काम जर केलं तर जगातील सर्व गुन्हेगारी समाप्त होऊ शकते. फक्त पोलिसांनी प्रामाणिकपणे आपलं कर्तव्य पार पाडलं पाहिजे", असं संजय गायकवाड यांनी म्हटलं होतं. "आता एक बातमी अशी वाचली की एक पोलीसवाला चोरांचा मास्टरमाइंड निघाला. तसेच बुलढाण्यात दोन पोलीस कर्मचारी असे होते की, त्यांची चोरांच्याबरोबर भागेदारी होती. त्या चोरांना पकडायला गेलं की हे आधीच त्यांना फोन करायचे, एवढंच नाही तर त्या चोरीचा माल यांच्या घरात राहायचा, आता मी त्यांचं नाव सांगणार नाही. राज्यातील पोलिसांनी कधी खरंच इमानदारीने काम केलं तर सर्वजण सुतासारखे सरळ होतील, गुन्हेगारी संपेल", असं आमदार संजय गायकवाड यांनी म्हटलं होतं.आमदार संजय गायकवाड यांच्या विधानासंदर्भात बोलताना देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं की, "मला असं वाटतं की पोलिसांबाबत असं बोलणं योग्य नाही. मी स्वतः या संदर्भात उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना सांगणार आहे की त्यांना कडक समज द्या. हे असं चालणार नाही, हे योग्य नाही. तरीही ते जर वारंवार असं बोलत असतील तर त्यावर ॲक्शन घेतली जाईकी, आमदार अर्जुन खोतकरांसह त्यांच्या मुलाला जीवे मारण्याची धमकी आली आहे.

### पोलीसवाला चोरांचा मास्टरमाइंड

यावर संजय गायकवाड यांनी म्हटलं की, "आम्हाला धमक्या येतात. जे समाजात चांगलं काम करतात, त्यांना धमक्या येतात. पोलीसवाले काही करू शकत नाहीत. माझ्या घरची गाडी उडवण्याचा प्रयत्न केला गेला. तेव्हा पोलिसांकडून काय चौकशी झाली? काहीही चौकशी झाली नाही", असं संजय गायकवाड यांनी म्हटलं.महाराष्ट्र पोलिसांसारखं अकार्यक्षम खातं जगात कुठेही नसेल. पोलीस खातं म्हणजे शासनाने कोणताही कायदा केला की यांचा एक हप्ता वाढला. गुटखा बंदी केली की यांचा हप्ता वाढला, दारू बंदी केली की यांनी चालू करायची की लगेच त्यांचा हप्ता वाढला.

# राजेंद्र पवार मानव संसाधन संचालकपदी!

## महावितरण ग्राहकसेवा आणि मानव संसाधन व्यवस्थापनात उल्लेखनीय कामगिरी

। मुंबई ।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**महावितरण कंपनीचे संचालक (मानव संसाधन) म्हणून राजेंद्र पवार यांनी कार्यभार स्वीकारला. त्यांची या पदावर थेट भरती प्रक्रियेतून निवड झाली आहे. याआधी ते पुणे परिमंडलाचे मुख्य अभियंता म्हणून कार्यरत होते. 'कर्तव्यदक्ष अधिकारी' म्हणून त्यांनी महावितरणमध्ये ओळख आहे.**




महावितरणमधील सेवेचा ३६ वर्षांचा अनुभव असणारे नवनियुक्त संचालक (मानव संसाधन) राजेंद्र पवार हे मूळचे भऊर (ता. देवळा, जि. नाशिक) येथील रहिवासी आहेत. त्यांनी विद्युत अभियांत्रिकी पदवी पुणे शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयातून (सीओईपी) विशेष प्राविण्यासह प्राप्त केली आहे. त्यानंतर १९८९ मध्ये तत्कालिन म. रा. विद्युत मंडळात कनिष्ठ अभियंता म्हणून वाशी (ता. पेण) येथे रूजू झाले. त्यानंतर पदोन्नतीवर त्यांनी सहायक अभियंता, उपकार्यकारी अभियंता पदी काम केले आहे. सन २०११ मध्ये थेट भरती प्रक्रियेमधून त्यांची कार्यकारी अभियंता पदी निवड झाली. या काळात त्यांनी पेण, कळवण, नाशिक, पनवेल, कल्याण येथे काम केले आहे. तसेच अधीक्षक अभियंता म्हणून नागपूर व पुणे येथे काम केले आहे. तर गेल्या सव्वादोन वर्षांपासून पवार पुणे परिमंडलाचे मुख्य अभियंता म्हणून कार्यरत होते. महावितरणमधील सेवेचा ३६ वर्षांचा अनुभव असणारे नवनियुक्त संचालक (मानव संसाधन) राजेंद्र पवार हे मूळचे भऊर (ता. देवळा, जि. नाशिक) येथील रहिवासी आहेत. त्यांनी विद्युत अभियांत्रिकी पदवी पुणे शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयातून (सीओईपी) विशेष प्राविण्यासह प्राप्त केली आहे. त्यानंतर १९८९ मध्ये तत्कालिन म. रा. विद्युत मंडळात कनिष्ठ अभियंता म्हणून वाशी (ता. पेण) येथे रूजू झाले.

### आपत्ती व्यवस्थापनाचे नेतृत्व



संचालक (मानव संसाधन) राजेंद्र पवार यांनी याआधीच्या सेवेत लोकाभिमुख प्रशासन, ग्राहकसेवा आणि मानव संसाधन व्यवस्थापनात उल्लेखनीय कामगिरी केली आहे. पुणे परिमंडलामध्ये मुख्य अभियंता म्हणून त्यांनी महसूलवाढ, नवीन वीजजोडण्या, छतावरील सौर ऊर्जा प्रकल्पांमध्ये विक्रमी कामगिरी केली आहे. सोबतच कर्मचारी प्रशिक्षण व कार्यशाळा, कर्मचारी प्रोत्साहनपर विविध उपक्रम, कर्मचारीपाल्यांची अनुकंपा तत्त्वावरील भरती प्रक्रिया आदींना मोठा वेग दिला. त्यांच्या नेतृत्वात प्रशिक्षण व विविध उपक्रमांमुळे पुणे लघु प्रशिक्षण केंद्राला सलग तीन वर्ष राज्यात प्रथम क्रमांक मिळाला आहे. त्यापूर्वी पवार यांनी स्वतः 'ऑन फिल्ड' राहून मुंबईचा महापूर, 'तौक्ते', 'निसर्ग' चक्रीवादळ, 'कोरोना' आदी संकटांमध्ये आपत्ती व्यवस्थापनाचे नेतृत्व केले आहे.

# सिंधूचे पाणी अडविण्यासाठी व्यवस्था नाही!

## हल्ल्यावरून शंकराचार्य स्वामी अविमुक्तेश्वरानंद यांची टीका



।ओडिशा।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**जम्मू-काश्मीरच्या पहलगाममध्ये दहशतवादी हल्ल्यानंतर सर्वच क्षेत्रातून हळहळ व्यक्त करणाऱ्या प्रतिक्रिया येत आहेत. अनेक देशांनी या हल्ल्याची दखल घेतली. भारतातील अध्यात्मिक क्षेत्रालाही या हल्ल्याचा धक्का बसला आहे. शंकराचार्य स्वामी अविमुक्तेश्वरानंद सरस्वती यांनी माध्यमांशी बोलताना हल्ल्यात मृत झालेल्या लोकांप्रती श्रद्धांजली व्यक्त केली. "या हल्ल्यानंतर उत्तराखंडमध्ये चालणाऱ्या चार धाम यात्रेवर विचार केला जात आहे. हल्ल्यामुळे यात्रा बंद करावी, असा विचार केला जात आहे, असे कळते. पण ही यात्रा बंद करू नये" अशी आमची मागणी असल्याचे शंकराचार्य स्वामी अविमुक्तेश्वरानंद म्हणाले आहेत.**

शंकराचार्य अविमुक्तेश्वरानंद पुढे म्हणाले की, सुरक्षेच्या कारणास्तव यात्रा बंद करणे योग्य होणार नाही. सुरक्षा व्यवस्था पुरवून यात्रा सुरू ठेवली पाहिजे. कुणीतरी आहे जो भारताला आव्हान देत आहे. हिंदू आहे का? असे विचारून मारले जाते. याचा अर्थ हे थेट भारताला, सरकारला आणि आपल्या नेत्यांना आव्हान आहे. सरकारने या आव्हानाला उत्तर दिले पाहिजे. हिंदू धर्माचार्य म्हणून मीही हिंदू धर्मासाठी चिंतित असून आपली सुरक्षा कशी राखली जाईल, यासाठी विचारमंथन सुरू आहे.स्वामी अविमुक्तेश्वरानंद पुढे म्हणाले, "सुरक्षा पुरविण्यात सरकार अपयशी ठरत आहे. हिंदू असल्यामुळे आपल्याला मारले जाते. मारणारा शेकडो किमीवरून त्याच्यासह मोठमोठे शस्त्र घेऊन आला. बाहेरची माणसे आरामात येऊन तब्बल २० ते ३० मिनिटे आमची माणसे मारून निघून गेले. कुठून आले आणि कुठे गेले? याचा काहीच पत्ता लागला नाही. या घटनेवरून कळते की, प्रत्येक हिंदूला आता स्वतःची सुरक्षा स्वतः करावी लागेल. आवश्यकता पडली तर शस्त्र आणि शास्त्रही शिकले पाहिजे आणि शस्त्र बाळगलेही पाहिजे."आपल्या घरात आपण चौकीदार ठेवलेला आहे. जेव्हा आपण बाहेर जातो, तेव्हा घरात घडलेल्या घटनेला चौकीदार जबाबदार असतो. पण इथे असे होत नाही. काही लोक म्हणतात, मी चौकीदार आहे. चौकीदाराने त्याचे काम प्रामाणिकपणे केले असते तर असा हल्ला करण्याची कुणाचीही हिंमत झाली नसती. पण इथे तर हल्लेखोर आले आणि आरामात निघून गेले. मग चौकीदार कुठे होता? चौकीदाराची कुठेच चर्चा होत नाही. आता म्हणत आहेत, आम्ही त्यांना धडा शिकवू वैगरे", अशी टीका स्वामी अविमुक्तेश्वरानंद यांनी केली. अतिरेकी पाकिस्तानातून आले, असे आता सांगितले जात आहे. तुम्हाला इतक्या लवकर हे कसे कळले, जर आता कळले असेल तर मग घटना घडण्याची आधी का नाही समजले. अतिरेकी पाकिस्तानातून आले असतील तर पाकिस्तानवर तगडी कारवाई केली जावी. पण फक्त सिंधू नदीचे पाणी अडवून चालणार नाही. आपल्या देशात एवढे पाणी साठविण्याचा पर्यायच नाही. मी काही तज्ज्ञांशी बोललो, ते म्हणाले की, सिंधू नदीचे पाणी अडवून ठेवण्यासाठी आपल्याकडे सध्या काहीच व्यवस्था नाही.शंकराचार्य अविमुक्तेश्वरानंद पुढे म्हणाले की, सुरक्षेच्या कारणास्तव यात्रा बंद करणे योग्य होणार नाही. सुरक्षा व्यवस्था पुरवून यात्रा सुरू ठेवली पाहिजे. कुणीतरी आहे जो भारताला आव्हान देत आहे. हिंदू आहे का? असे विचारून मारले जाते. याचा अर्थ हे थेट भारताला, सरकारला आणि आपल्या नेत्यांना आव्हान आहे. सरकारने या आव्हानाला उत्तर दिले पाहिजे. हिंदू धर्माचार्य म्हणून मीही हिंदू धर्मासाठी चिंतित असून आपली सुरक्षा कशी राखली जाईल, यासाठी विचारमंथन सुरू आहे. स्वामी अविमुक्तेश्वरानंद पुढे म्हणाले, "सुरक्षा पुरविण्यात सरकार अपयशी ठरत आहे. हिंदू असल्यामुळे आपल्याला मारले जाते. मारणारा शेकडो किमीवरून त्याच्यासह मोठमोठे शस्त्र घेऊन आला. बाहेरची माणसे आरामात येऊन तब्बल २० ते ३० मिनिटे आमची माणसे मारून निघून गेले. कुठून आले आणि कुठे गेले?

### चौकीदाराची कुठेच चर्चा होत नाही

याचा काहीच पत्ता लागला नाही. या घटनेवरून कळते की, प्रत्येक हिंदूला आता स्वतःची सुरक्षा स्वतः करावी लागेल. आवश्यकता पडली तर शस्त्र आणि शास्त्रही शिकले पाहिजे आणि शस्त्र बाळगलेही पाहिजे."आपल्या घरात आपण चौकीदार ठेवलेला आहे. जेव्हा आपण बाहेर जातो, तेव्हा घरात घडलेल्या घटनेला चौकीदार जबाबदार असतो. पण इथे असे होत नाही. काही लोक म्हणतात, मी चौकीदार आहे. चौकीदाराने त्याचे काम प्रामाणिकपणे केले असते तर असा हल्ला करण्याची कुणाचीही हिंमत झाली नसती. पण इथे तर हल्लेखोर आले आणि आरामात निघून गेले. मग चौकीदार कुठे होता? चौकीदाराची कुठेच चर्चा होत नाही.

# आमचं पाणी वाहील किंवा त्यांचं रक्त!

## पाकिस्तानी नेत्याच्या विधानानंतर मंत्र्यांनं दिलं सडेतोड प्रत्युत्तर!



।मुंबई।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**जम्मू काश्मीरच्या पहलगाम या पर्यटनस्थळी दहशतवाद्यांनी पर्यटकांना लक्ष्य केल्यानंतर आता भारतातील केंद्र सरकारने पाकिस्तानला सज्जड इशारा दिलाय. सिंधू नदी जल करार रद्द करण्यापासून पाकिस्तानी नागरिकांना भारतातून हकलून लावण्यापर्यंतचे अनेक आदेश पंतप्रधान नरेंद्र मोदींनी दिले आहेत. मोदींच्या या आक्रमक पावित्र्यानंतर पाकिस्तानकडूनही तितकेच आक्रमक प्रत्युत्तर आले.**

पाकिस्तान पीपल्स पार्टी (PPP) चे प्रमुख बिलावल भुट्टो-झरदारी यांनी सिंधू नदीवरून भारताविरोधात केलेल्या विधानावर आता केंद्रीय मंत्री हरदीप सिंग पुरी यांनी प्रत्युत्तर दिलं आहे.सिंध प्रांतातील सुक्कुर येथे एका जाहीर सभेत भुट्टो-झरदारी म्हणाले होते की, "सिंधू आमची आहे आणि आमचीच राहील. एकतर या नदीतून आमचं पाणी त्यातून वाहील किंवा त्यांचं रक्त वाहील." त्यांच्या या विधानाची सर्वत्र चर्चा झाली. जगभरातील माध्यमांनी याची दखल घेतली. आता भारतानेही या विधानाची दखल घेतली असून केंद्रीय मंत्री हरदीप पुरी सिंग यांनी प्रतिक्रिया दिली आहे.हरदीप पुरी सिंग म्हणाले, "मी त्यांचं विधान ऐकलं. त्यांना कुठेतरी जाऊन उडी मारण्यास सांगा. पण पाणीच नसेल तर ते उडी कुठे मारतील? अशा विधानांना प्रतिष्ठा देऊ नका.""पहलगामची घटना ही स्पष्टपणे एका शेजारील राज्याने केलेला सीमापार दहशतवादी हल्ला आहे आणि ते जबाबदारी घेत आहेत. पूर्वीप्रमाणे, आता कोणताही व्यवसाय सुरू राहणार नाही. पंतप्रधान मोदींनी म्हटल्याप्रमाणे, पाकिस्तानला मोठी किंमत मोजावी लागेल आणि ही फक्त सुरुवात आहे. दहशतवादी जगण्याचा सर्वात मूलभूत अधिकार हिरावून घेतात. संपूर्ण जग याचा निषेध करत आहे", असं ते पुढे म्हणाले.पुरी यांनी लंडनमधील पाकिस्तान उच्चायुक्तालयातील पाकिस्तानी लष्कर आणि हवाई सल्लागार कर्नल तैमूर राहात यांनी केलेल्या गळा चिरण्याच्या हावभावावरही भाष्य केले. "हा राज्य पुरस्कृत दहशतवाद आहे. आपण अशा टप्प्यावर पोहोचलो आहोत जिथे त्यांना किंमत मोजावी लागेल. जर त्यांना (पाकिस्तानला) वाटत असेल की ते सिंधू पाणी कराराच्या निलंबनातून वाचू शकतील, तर मी त्यांना शुभेच्छा देतो," असे ते म्हणाले."पहलगामची घटना ही स्पष्टपणे एका शेजारील राज्याने केलेला सीमापार दहशतवादी हल्ला आहे आणि ते जबाबदारी घेत आहेत.

### संपूर्ण जग याचा निषेध करत आहे

पूर्वीप्रमाणे, आता कोणताही व्यवसाय सुरू राहणार नाही. पंतप्रधान मोदींनी म्हटल्याप्रमाणे, पाकिस्तानला मोठी किंमत मोजावी लागेल आणि ही फक्त सुरुवात आहे. दहशतवादी जगण्याचा सर्वात मूलभूत अधिकार हिरावून घेतात. संपूर्ण जग याचा निषेध करत आहे", असं ते पुढे म्हणाले.

# छावा वाईट फिल्म आहे


२०२५ या वर्षातील जवळपास सर्वच रेकॉर्ड मोडत विकी कौशल आणि रश्मिका मंदान्नाच्या 'छावा' चित्रपटाने बॉक्स ऑफिसवर चांगलीच मजल मारली. या चित्रपटाने ६०० कोटींपेक्षा जास्त कमाई केली. प्रदर्शनाच्या पुर्वीपासूनच हा चित्रपट अनेक कारणांनी चर्चेत होता. प्रदर्शनाआधीच प्रेक्षकांचाआ तूफान प्रतिसाद चित्रपटाला मिळाला होता. या चित्रपटामध्ये बॉलीवूडसह मराठी इंडस्ट्रीतील अनेक कलाकारांनी मुख्य भूमिका साकारली आहे. अशातच काही दिवसांपुर्वी मराठी अभिनेता आस्ताद काळेने 'छावा'बद्दल एक पोस्ट शेअर केली होती. चित्रपटाच्या प्रदर्शनानंतर दोन महिन्यांनी आस्तादने फेसबुक पोस्ट शेअर करत या चित्रपटातील खटकलेले मुद्दे उपस्थित केले होते."छावा वाईट फिल्म आहे" असं म्हणत आस्तादने पोस्ट शेअर केली होती. नंतर त्याने ती पोस्ट काढूनही टाकली. पण या पोस्टमुळे अभिनेत्याला ट्रोलिंगचा सामना करावा लागला होता. अशातच आता आस्तादच्या या व्यक्तव्यावर अभिनेत्री मेघा धाडेनी तिची प्रतिक्रिया दिली आहे. मेघाने अमृता फिल्म्स या युट्यूब चॅनेलला दिलेल्या मुलाखतीत तिचं मत व्यक्त केलं. यावेळी तिने तुला खात्री नव्हती तर त्यात तू स्वत:हून काम का केलं?" असा प्रश्नही उपस्थित केला.याबद्दल मेघा असं म्हणाली की, "अभिव्यक्ती व्यक्त करण्याचं स्वातंत्र्य प्रत्येकाला असलं तरी मला असं वाटतं की, आस्तादचं म्हणणं मला पटलं नाही. ती फिल्म वाईट आहे आणि इतिहास म्हणून तो चित्रपट चुकीचा आहे असं तो जे बोलला ते मला पटलं नाही. अरे बाबा कोणीतरी इतक्या मोठ्या पातळीवर आपल्या शंभूराजांना, त्यांनी दिलेल्या बलिदानाला सगळ्या जगात पोहोचवत आहे.

# अभिनेत्री शिरीन मिर्झाने गुडन्यूज दिली!

'स्टार प्लस' वाहिनीवरील 'ये हैं मोहब्बते' मालिका चांगलीच गाजली होती. अभिनेत्री दिव्यांका त्रिपाठी आणि अभिनेता करण पटेल यांची प्रमुख भूमिका असलेल्या या मालिकेने सहा वर्ष प्रेक्षकांच्या मनावर अधिराज्य गाजवलं होतं. इशिता अय्यर आणि रमन भल्लाची प्रेमकथा प्रेक्षकांना खूप आवडली होती. त्यामुळे या मालिकेचे वेगवेगळ्या भाषांमध्ये रिमेक झाले. सध्या 'स्टार प्रवाह' वाहिनीवर सुरू असलेली 'प्रेमाची गोष्ट' ही मालिका 'ये हैं मोहब्बते'चा रिमेक आहे. 'ये हैं मोहब्बते' मालिकेतील एक अभिनेत्री सध्या खूप चर्चेत आली आहे. कारण या अभिनेत्रीने नुकतीच गुडन्यूज दिली आहे.'ये हैं मोहब्बते' मालिकेतून घराघरात पोहोचलेली अभिनेत्री शिरीन मिर्झाने गुडन्यूज दिली आहे. सध्या मालिकाविश्वापासून दूर असलेली शिरीन लवकरच आई होणार आहे. अभिनेत्रीने पती हसन सरताजबरोबरचा व्हिडिओ शेअर करून चाहत्यांना गुडन्यूज दिली आहे. त्यामुळे चाहते तिच्यावर शुभेच्छांचा वर्षाव करत आहेत.शिरीनने शेअर केलेल्या व्हिडीओमध्ये, ती पती हसनबरोबर एका शेतात पाहायला मिळत आहे. दोघांनी काळ्या रंगाचे आउटफिट घातले आहेत. याच वेळी शिरीन बेबी बंप फ्लॉन्ट करताना दिसत आहे. 'स्टार प्लस' वाहिनीवरील 'ये हैं मोहब्बते' मालिका चांगलीच गाजली होती. अभिनेत्री दिव्यांका त्रिपाठी आणि अभिनेता करण पटेल यांची प्रमुख भूमिका असलेल्या या मालिकेने सहा वर्ष प्रेक्षकांच्या मनावर अधिराज्य गाजवलं होतं.

# खुशबूला शौचालयात लपावं लागलेलं

बॉलीवूडची बोल्ड व ग्लॅमरस अभिनेत्री दिशा पाटनीची थोरली बहीण खुशबू पाटनी भारतीय सैन्यात मेजर होती. तिने १० वर्षे सैन्यात सेवा बजावली आणि नंतर निवृत्ती घेतली. सैन्यात जाण्याचा निर्णय ते निवृत्ती आणि नवीन प्रवास याबद्दल तिनेच माहिती दिली. जोश टॉक्समध्ये खुशबूने सांगितलं की ती २००८ मध्ये बरेली सोडून शिक्षणासाठी ग्रेटर नोएडाला आली होती. खुशबूसाठी हे शहर म्हणजे वेगळंच जग होतं. तिला इथे विचित्र अनुभवही आले. तिने सांगितलं की पहिल्या वर्षात काही मुलं तिचा पाठलाग करायचे, आधी ती बाहेर एकटी जायची, पण नंतर मित्र सोबत नसतील तर जायचीच नाही.खुशबूने सांगितलं की एकदा ती तिच्या एका मैत्रिणीबरोबर बाहेर गेली होती. अचानक एका काळ्या गाडीतील काही तरुण त्यांचा पाठलाग करू लागले. त्यापैकी एकाजवळ बंदुक होती. रात्री उशीर झाल्याने बस, ऑटो मिळत नव्हते. त्या मुलांना घाबरलेल्या खुशबूने स्वतःला सरकारी शौचायलात कोंडून घेतलं होतं. रात्री एक वाजेपर्यंत ती तिथेच थांबली आणि नंतर तिची एक मैत्रीण तिथे आली आणि तिला घेऊन गेली. खुशबूने सांगितले की त्यावेळी ती खूप लहान होती. आठवडाभरानंतर तिची परीक्षा होती आणि तिने अभ्यासाला सुरुवात केली. खुशबू म्हणाली, "आता मला वाटतं की मी त्यावेळी रडायला हवं होतं, देवीच्या आशीर्वादाने माझ्या आत एक अनोळखी शक्ती संचारली. मात्र, माझ्या स्वतःच्या अस्तित्वाबाबत माझ्या मनात प्रश्न निर्माण झाले होते आणि मला त्याची उत्तरं मिळत नव्हती. मी इतकी घाबरले होते की मी कोणत्याही पुरुषाच्या नजरेस नजर देऊ शकत नव्हते."खुशबूने सांगितलं की कॉलेजच्या चौथ्या वर्षात एक तरुण कॅप्टन तिच्या कॉलेजमध्ये आले होते.



# सरकार तुम्ही केलंय मार्केट जाम

बिग बॉस मराठी'च्या पाचव्या पर्वामुळे अभिनेत्री जान्हवी किल्लेकर घराघरांत लोकप्रिय झाली. तिने आजवर छोट्या पडद्यावरील अनेक लोकप्रिय मालिकांमध्ये काम केलेलं आहे. मात्र, 'बिग बॉस'मुळे तिला खऱ्या अर्थाने लोकप्रियता मिळाली. या शोमध्ये तिने प्रत्येक टास्क जिद्दीने परफॉर्म करत, महाअंतिम फेरी गाठली होती. आता शो संपल्यावरही तिची लोकप्रियता कायम आहे यामुळेच अनेक कार्यक्रमांना जान्हवीला विशेष पाहुणी म्हणून निमंत्रित केलं जातं. तिचा चाहतावर्ग आजच्या घडीला मोठ्या प्रमाणात आहे.कारण, जान्हवी उत्तम अभिनेत्री आहेच पण, याचबरोबर ती जबरदस्त डान्स सुद्धा करते. जान्हवी यापूर्वी काही लोकप्रिय कोळीगीतांमध्ये सुद्धा झळकली आहे. याशिवाय 'बिग बॉस'मध्ये असताना जान्हवी आणि सूरजचा "कोंबडी पळाली..." गाण्यावरील डान्स सर्वत्र व्हायरल झाला होता. यामुळेच जान्हवीला चाहत्यांनी गौतमीबरोबर लाइव्ह कार्यक्रमात डान्स करण्याची विनंती केली. गौतमी आणि जान्हवी एकत्र रंगमंचावर आल्याचं पाहून 'सरकार तुम्ही केलंय मार्केट जाम' हे गाणं लागलं. दोघींनी काही सेकंदातच या गाण्यावर ठेका धरून जबरदस्त डान्स केला. जान्हवी आणि गौतमीची या गाण्यावर डान्स करतानाची एनर्जी पाहण्यासारखी होती. यानंतर उपस्थितांनी सुद्धा या दोघींचं अप्रतिम डान्ससाठी कौतुक केलं.

# विराट-अनुष्का लंडनला शिफ्ट झाले!

विराट कोहली व अनुष्का शर्मा या दोघांकडे मनोरंजनविश्वातील आदर्श जोडपं म्हणून पाहिलं जातं. त्यांचे चाहते प्रेमाने त्यांना 'विरुष्का' म्हणतात. विराट व अनुष्का यांना दोन मुलं आहेत. गेल्या काही वर्षांपासून अनुष्का शर्मा बॉलीवूडच्या ग्लॅमरस आयुष्यापासून दूर आहे. कोहली कुटुंबीय भारत देश सोडून लंडन येथे स्थायिक होणार असल्याच्या चर्चा मध्यंतरी सर्वत्र रंगल्या होत्या. त्यानंतर विराटचे बालपणीचे प्रशिक्षक राजकुमार शर्मा यांनीही या वृत्ताला दुजोरा दिला होता. विराट कोहली सध्या फक्त क्रिकेट सामने खेळण्यासाठी आणि महत्त्वाच्या कार्यक्रमांसाठी मायदेशी येत असल्याचं पाहायला मिळत आहे. यावर आता प्रसिद्ध बॉलीवूड अभिनेत्री माधुरी दीक्षितचे पती डॉ. श्रीराम नेनेंनी भाष्य केलं आहे.'हेल्थ अँड वेलफेयर' विषयी माहिती देणारं युट्यूब चॅनेल डॉ. नेने चालवतात. काही महिन्यांपूर्वी ते युट्यूबर रणवीर अलाहबादियाबरोबर पॉडकास्टमध्ये सहभागी झाले होते. यावेळी अनुष्का आणि विराटने भारत सोडून लंडनला जाण्याचा निर्णय का घेतला? याविषयी डॉ. नेनेंनी माहिती दिली.डॉ. नेनेंनी विराट-अनुष्काची काही महिन्यांपूर्वी भेट घेतली होती. याबद्दल सांगताना नेने म्हणाले, "ते दोघंही खूपच चांगले आहेत. मी त्यांना अनेकवेळा भेटलो आहे. ते दोघंही तेव्हा लंडनला कायमस्वरुपी शिफ्ट होण्याच्या विचारात होते कारण, ते दोघंही इतके प्रसिद्ध आहेत, त्यांनी भरपूर यश मिळवलंय त्यामुळे इथे राहून त्यांना कुटुंबासह प्रत्येक क्षण वैयक्तिक आयुष्य हवं तसं एन्जॉय करणं शक्य नाहीये. ते पटकन चर्चेत येतात.""अनुष्का आणि विराट लंडनला गेले कारण त्यांना त्यांच्या दोन्ही मुलांना इथल्या ग्लॅमरपासून दूर ठेवायचं आहे. अनुष्काला दोन्ही मुलांचं अतिशय सामान्यपणे संगोपन करून त्यांना वाढवायचं आहे. ते दोघंही खूपच चांगले आहेत. इथे जरा बाहेर गेलं तरी एखादा चाहता सेल्फी मागतो. अर्थात ही वाईट गोष्ट नाहीये पण, सतत असं होत असल्याने त्रास होऊ शकतो. आता विराट-अनुष्काबरोबर त्यांची मुलंही असतात त्यामुळेच त्यांना या सगळ्यापासून दूर ठेवण्यासाठी त्यांना तो निर्णय घेतला आहे." असं डॉ. श्रीराम नेनेंनी सांगितलं.दरम्यान, विराट-अनुष्काने एकमेकांना अनेक वर्षे डेट केल्यावर २०१७ मध्ये लग्न केलं.



# तू माझ्यासारखा नाही खेळू शकत!

## रोहित शर्मा लखनौच्या खेळाडूला असं का म्हणाला?

। नवी दिल्ली । प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**रोहित शर्माने खराब सुरूवातीनंतर आयपीएल २०२५ मध्ये दणक्यात पुनरागमन करत आपला फॉर्म परत मिळवला आहे. रोहितने लागोपाठ दोन अर्धशतकं झळकावत संघाच्या विजयात महत्त्वपूर्ण भूमिका बजावली आहे. यादरम्यान रोहित शर्माचा एक व्हीडीओ लखनौ सुपर जायंटसने शेअर केला आहे. यामध्ये रोहित शर्मा लखनौच्या युवा खेळाडूशी चर्चा करत आहे.**



मुंबई इंडियन्सचा पुढील सामना लखनौ सुपर जायंट्स संघाविरूद्ध होणार आहे. तर हा सामना मुंबईच्या घरच्या मैदानावर म्हणजेच वानखेडेवर होणार आहे. यापूर्वी दोन्ही संघ मैदानावर सराव करताना दिसत आहेत. तर दोन्ही संघातील खेळाडू एकमेकांशी भेट घेत आहेत. दरम्यान रोहित शर्मा लखनौच्या युवा खेळाडूला अब्दुल समदला फलंदाजीच्या टिप्स देताना दिसत आहे. रोहित शर्मा स्टाईल टिप्स अब्दुलही शांतपणे ऐकताना दिसतोय. तर शंका असल्यास रोहितला प्रश्नही विचारतोय. अब्दुल समद हा जम्मू-काश्मीरचा एक स्टार क्रिकेटपटू आहे आणि गेल्या अनेक वर्षांपासून तो आयपीएलचा भाग आहे.सोशल मीडियावर व्हायरल होत असलेल्या या व्हिडिओमध्ये लखनौ सुपर जायंट्सचा स्फोटक फलंदाज अब्दुल समद रोहित शर्माबरोबर चर्चा करताना दिसत आहे. दोन्ही संघांमधील सामन्यापूर्वी रोहितने अब्दुल समदला नेटवर फलंदाजीच्या महत्त्वपूर्ण टिप्स दिल्या. यादरम्यान रोहितने अब्दुल समदला खेळपट्टीपासून ते शॉट सिलेक्शनपर्यंत सर्व काही सांगितलं. प्रत्येक क्रिकेट चाहता रोहित शर्माचं क्रिकेटचं ज्ञान पाहून त्याचं कौतुक करत आहे.अब्दुल समदला फलंदाजीच्या टिप्स देताना रोहित शर्मा म्हणाला, "विकेटचा पण एक वेग असतो. प्रत्येक दिवस वेगळा असतो. आज दमट हवामान आहे, त्यामुळे चेंडू हळू येईल. उद्या वारा असेल तर खेळपट्टी चांगली खेळते. जोपर्यंत मैदानावर जाऊन तू खेळत नाही तोपर्यंत याचा अंदाज येत नागी. मैदानावर येऊन तू कसा फटके खेळतोस हे तुझ्यावर असणार आहे."रोहित शर्मा पुढे म्हणाला, "सर्वच गोष्टी टेक्निकवर नाही चालत असं मानून चालू, चल. पण तू माझ्यासारखा नाही खेळू शकत, मी तुझ्यासारखा नाही खेळू शकत. तुझ्याकडे तुझं वेगळं टॅलेंट आहे. मी तुझी कॉपी करण्याचा प्रयत्न करेन, मी तुझी कॉपी करेन, याची टेक्निक बघूया, त्याची टेक्निक बघतो. हे करत राहिला तर आयुष्य निघून जाईल. सगळ्यात जास्त महत्त्वाचं काय आहे तर तुझे विचार. तू कसा विचार करतो आणि ते कसं अंमलात आणतो, हे सर्वात जास्त महत्त्वाचं आहे."२३ वर्षीय फिनिशर अब्दुल समद २०२० पासून आयपीएलचा भाग आहे. त्याने या हंगामात ८ सामन्यांमध्ये १९४.८२ च्या स्ट्राईक रेटने ११३ धावा केल्या आहेत. ज्यामध्ये राजस्थान रॉयल्सविरुद्ध ११ चेंडूत ३० धावांची खेळी लक्षवेधी ठरली. याआधी तो सनरायझर्स हैदराबादकडून ५ वर्षे खेळला होता. त्यादरम्यानही त्याने आपल्या खेळाने सर्वांना प्रभावित केले होते.मुंबई इंडियन्सचा पुढील सामना लखनौ सुपर जायंट्स संघाविरूद्ध होणार आहे. तर हा सामना मुंबईच्या घरच्या मैदानावर म्हणजेच वानखेडेवर होणार आहे. यापूर्वी दोन्ही संघ मैदानावर सराव करताना दिसत आहेत. तर दोन्ही संघातील खेळाडू एकमेकांशी भेट घेत आहेत. दरम्यान रोहित शर्मा लखनौच्या युवा खेळाडूला अब्दुल समदला फलंदाजीच्या टिप्स देताना दिसत आहे. रोहित शर्मा स्टाईल टिप्स अब्दुलही शांतपणे ऐकताना दिसतोय. तर शंका असल्यास रोहितला प्रश्नही विचारतोय. अब्दुल समद हा जम्मू-काश्मीरचा एक स्टार क्रिकेटपटू आहे .

### समदला टिप्स देताना रोहित

आणि गेल्या अनेक वर्षांपासून तो आयपीएलचा भाग आहे.सोशल मीडियावर व्हायरल होत असलेल्या या व्हिडिओमध्ये लखनौ सुपर जायंट्सचा स्फोटक फलंदाज अब्दुल समद रोहित शर्माबरोबर चर्चा करताना दिसत आहे. दोन्ही संघांमधील सामन्यापूर्वी रोहितने अब्दुल समदला नेटवर फलंदाजीच्या महत्त्वपूर्ण टिप्स दिल्या. यादरम्यान रोहितने अब्दुल समदला खेळपट्टीपासून ते शॉट सिलेक्शनपर्यंत सर्व काही सांगितलं. प्रत्येक क्रिकेट चाहता रोहित शर्माचं क्रिकेटचं ज्ञान पाहून त्याचं कौतुक करत आहे.अब्दुल समदला फलंदाजीच्या टिप्स देताना रोहित शर्मा म्हणाला, "विकेटचा पण एक वेग असतो. प्रत्येक दिवस वेगळा असतो. उद्या वारा असेल तर खेळपट्टी चांगली खेळते. जोपर्यंत मैदानावर जाऊन तू खेळत नाही तोपर्यंत याचा अंदाज येत नागी. मैदानावर येऊन तू कसा फटके खेळतोस हे तुझ्यावर असणार आहे.

# पंजाब-केकेआर सामना पावसामुळे रद्द!

## प्लेऑफ गाठण्याच्या केकेआरच्या आशांना बसला धक्का

। नवी दिल्ली । प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**आयपीएल २०२५ मधील कोलकाता नाईट रायडर्स वि. पंजाब किंग्स यांच्यातील सामना पावसामुळे रद्द करण्यात आला. ईडन गार्डन्सवर झालेल्या या सामन्यात वादळी वारा आणि पावसाने जोरदार हजेरी लावली. पावसाने विश्रांती न घेतल्याने अखेरीस सामना रद्द झाला. यामुळे दोन्ही संघांना एक-एक गुण मिळाला आहे.**




यामुळे पंजाबचा संघ चौथ्या स्थानी पोहोचला आहे, तर केकेआर सातव्या स्थानी राहिला आहे. हा सामना रद्द झाल्याने प्लेऑफ गाठण्याच्या केकेआरच्या आशांना धक्का बसला आहे.पंजाबने प्रियांश आर्य आणि प्रभसिमरन सिंग यांच्या १२० धावांच्या भागीदारीच्या जोरावर २०१ धावांचा डोंगर उभारला.

प्रत्युत्तरात केकेआरने पहिल्या षटकात ७ धावा करत सामन्याला चांगली सुरुवात केली, पण त्यानंतर दुसरे षटक सुरू होण्यापूर्वी पावसाने हजेरी लावली आणि सामना थांबवण्यात आला.

काही वेळाने पावसाचा जोर कायम राहिल्याने सामना रद्द करण्यात आला.आयपीएल २०२५ मधील पंजाब किंग्स वि. कोलकाता नाईट रायडर्स सामना पावसामुळे रद्द करण्यात आला आहे. कोलकातामध्ये जोरदार पावसाने हजेरी लावल्याने हा निर्णय घेण्यात आला. सामना रद्द झाल्याने दोन्ही संघांना १-१ गुण देण्यात आला आहे. प्लेऑफमध्ये जाण्यासाठी कोलकाता संघाला सर्व सामने जिंकणं महत्त्वाचं होतं.

पण १ गुण मिळाल्याने संघासाठी हा धक्का असणार आहे. तर पंजाबसाठी १ गुणही सोयीचा ठरला.केकेआर वि. पंजाब किंग्स सामना सुरू असताना पावसाने अचानक हजेरी लावली आहे. विश्रांती घेतल्यानंतर पावसाला पुन्हा सुरूवात झाली आहे.

टी-२० सामन्याचा निकाल लागण्यासाठी कमीत कमी ५ षटकांचा सामना होणं महत्त्वाचं आहे. त्यामुळे ५ षटकांचा सामना सुरू होण्यासाठी कट ऑफ वेळ ११.४४ आहे. ५ षटकांचा सामना झाल्यास ६१ धावांचं लक्ष्य केकेआरला देण्यात येईल. ईडन गार्डन्सवर सुरू असलेला पंजाब किंग्स वि. केकेआर सामना पावसामुळे थांबला आहे. वादळी पाऊस असल्याने मैदान कव्हर करण्यातही ग्राऊंड स्टाफला मोठा अडथळा येत आहे. पण पाऊस जर १०.३५ पर्यंत थांबून पुन्हा सुरू झाला नाही तर सामन्याची षटकं कमी व्हायला सुरूवात होईल.

### कोलकाताला बसला धक्का

ईडन गार्डन्सवर खेळवण्यात येत असलेला पंजाब-केकेआर सामना थांबवण्यात आला आहे. पंजाबने दिलेल्या २०२ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करण्यासाठी केकेआरची जोडी उतरली. पहिल्या षटकात ७ धावा केल्यानंतर अचानक सामना थांबवला. कोलकातामध्ये अचानक जोरदार वारा सुटला आणि सामना थांबवला.

स्मार्ट PCMC SMART CITY
महाईन्यूज ™
ePaper
epaper.mahaenews.com
। रविवार ।
। दि. 27 एप्रिल 2025।
पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती

## माणुसकीला काळीमा फासणारा हल्ला

# पहलगाम भ्याड हल्ला असंवेदनशील - डॉ.दीपक शहा

### शिक्षण विश्व: प्रतिभा ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूटच्या वतीने पहलगाम हल्ल्यातील मृतांना श्रद्धांजली

। पिंपरी- चिंचवड । प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**जम्मू काश्मीर येथील पहलगाम भ्याड हल्ला माणुसकीला काळीमा फासणारा आहे. अशा प्रकारच्या घटना निषेधार्थ असून या हल्ल्यांमध्ये जीव गमावलेल्या व्यक्तींना श्रद्धांजली अर्पित करण्याबरोबर त्यांच्या कुटुंबीयांच्या सोबत आम्ही आहोत अशा भावना कमला एज्युकेशन सोसायटीचे संस्थापक सचिव डॉ.दीपक शहा यांनी व्यक्त केल्या.**



चिंचवड येथील कमला एज्युकेशन सोसायटी संचलित प्रतिभा ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूट मधील प्रतिभा इन्स्टिट्यूट ऑफ बिझनेस मॅनेजमेंट, प्रतिभा कॉलेज ऑफ कॉमर्स अँड कॉम्प्युटर स्टडीज, प्रतिभा ज्युनिअर कॉलेज, प्रतिभा शिक्षण शास्त्र महाविद्यालय, प्रतिभा इंटरनॅशनल स्कूल अँड ज्युनिअर कॉलेज (सीबीएसई) मध्ये श्रद्धांजली अर्पित करण्यात आली. यावेळी कमला एज्युकेशन सोसायटीचे संस्थापक सचिव डॉ.दीपक शहा यांनी संस्थेच्या वतीने भावपूर्ण श्रद्धांजली करत शोकाकुल परिवारांच्या दुःखात आम्ही सहभागी आहोत असा संवेदना यावेळी व्यक्त केल्या. संस्थेच्या खजिनदार डॉ. भूपाली शहा , संचालिका तेजल शहा समवेत महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.ए.के. वाळुंज, मुख्य प्रशासकीय अधिकारी डॉ.राजेंद्र कांकरिया, उपप्राचार्या डॉ. क्षितीजा गांधी, डॉ.वनिता कुऱ्हाडे, एमबीएचे संचालक डॉ. सचिन बोरगावे, सीबीएसईच्या प्राचार्या वृंदा जोशी ,लिजा सोजू ,बीएडच्या प्राचार्या डॉ.पौर्णिमा कदम,हितेन करानी , तृप्ती शहा समवेत विभाग प्रमुख , प्राध्यापक, शिक्षक , शिक्षकेत्तर कर्मचारी वर्ग , विद्यार्थी, सेवक , सेविका आदीं उपस्थित होते.

## 'लाडक्या बहिणींनाच नाट्यगृह हवं आहे', असं दादांना सांगा!

### नाट्यगृहाला लवकर निधी मिळेल–अभिनेते मकरंद अनासपुरे यांची मिश्किल टिपणी

। तळेगाव दाभाडे । प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**तळेगावकरांची नाट्यगृहाची मागणी पूर्ण होणे अवघड नाही. 'तळेगाव दाभाडेमधील लाडक्या बहिणींनाच नाट्यगृह हवं आहे', असे उपमुख्यमंत्री व अर्थमंत्री अजित पवार यांना सांगा म्हणजे लवकर निधी मिळेल, अशी मिश्किल टिपणी अभिनेते मकरंद अनासपुरे यांनी केली. दरम्यान, जगभरातील दहशतवाद्यांच्या धर्माविषयी कल्पना काढून टाकून त्यांचा ब्रेनवॉश करण्याचे ईश्वराला साकडे घालतो, असेही अनासपुरे म्हणाले.**




अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदे तळेगाव दाभाडे शाखेच्या २० व्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात अभिनेते अनासपुरे बोलत होते. कार्यक्रमाची सुरुवात नांदी, गणेश वंदना व मैत्र यमन रागात सादर झालेल्या सतार वादनाने झाली. दरम्यान, यंदाचा कलागौरव पुरस्कार हास्य जत्रा फेम अभिनेत्री नम्रता संभेराव व प्रसिद्ध अभिनेते, दिग्दर्शक व लेखक प्रसाद खांडेकर यांना, प्रसिद्ध सतार वादक विदुर महाजन यांना जीवन गौरव पुरस्काराने, तर प्रा. नितीन फाकटकर यांना विशेष गौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. यावेळी आमदार सुनील शेळके, प्रगतशील शेतकरी सुनील जाधव, नंदकुमार वाळंज, नाट्य परिषद तळेगाव दाभाडे शाखेचे संस्थापक अध्यक्ष सुरेश धोत्रे, कार्याध्यक्ष गणेश काकडे, प्रमुख कार्यवाह विश्वास देशपांडे, सचिव संजय वाडेकर, संचालक सुरेश दाभाडे, विलास काळोखे, तेजस धोत्रे, नंदकुमार वाळुंज, राजेश बारणे, संजय चव्हाण, सुनील जाधव, गणेश खांडगे, कृष्णा कारके, हरिश्चंद्र गडसिंग, दादासाहेब उन्हे, चंद्रकांत भिडे आदी उपस्थित होते. अभिनेते अनासपुरे म्हणाले, की पुरस्कार प्रदान केलेल्यांची तपश्चर्या, शिस्त वाखाणण्याजोगी आहे. अभिनेत्री नम्रता संभेराव व अभिनेते प्रसाद खांडेकर यांना धडपडताना जवळून पाहिले आहे. तळेगाव दाभाडे शहर सुसंस्कृत व राहण्यास वातावरण पोषक असल्याने इथे घर घेण्याचा विचार असल्याचेही अनासपुरे यांनी सांगितले. आमदार सुनील शेळके म्हणाले, की नाट्य परिषदेच्या तळेगाव दाभाडे शाखेची वीस वर्षाची वाटचाल वखाणण्याजोगी आहे. सर्व घटकांना सोबत घेऊन जाण्याची कला नाट्य परिषदेने जपली आहे. तळेगाव दाभाडे शहरात नाट्यगृहासाठी आपण आग्रही असून, आपल्या कार्यकाळात नाट्यगृहाचे काम तडीस नेण्याचा संकल्प आहे. त्यासाठी येत्या जून-जुलैमध्ये अर्थमंत्री अजित पवार यांनी निधी देण्याचा शब्द दिल्याचेही आमदार शेळके यांनी सांगितले. पुरस्काराला उत्तर देताना महाजन म्हणाले, 'जिना यहाँ, मरना यहाँ', असे तळेगावबद्दल वाटते. मावळातील सर्व शाळांमधील विद्यार्थ्यांपर्यंत सतार हे वाद्य पोहोचविण्याचा संकल्प आहे.


BLOSSOM YOUR KNOWLEDGE
Gayatri English Medium School
& Jr. College, Moshi
We're Hiring
AI/ML Freshers!
Eligible?
• B.E./B.Tech in CS/IT/AI/DS
• Solid ML & Python skills
• Passion for AI/ML?
Internship-cum-Placement | Min. 6.5 CGPA
Apply now & work on real-world AI projects!
APPLY TODAY!
Let's build the future together.
Location: Pune
gayatriems@gmail.com
9689881670


ADMISSION OPEN
From 21st April 2025
1 Hour /day
Monday to Saturday
Moaraya Shikshan Sanstha Computer Vacation Batch
"यत् भावो – तत् भवति"
Our Courses
> Corel Draw
> Adobe Photoshop
> Scratch Animation
> 'C' Language
> 'C ++' Language
> Basic Java
> Basic Tally
> M. S. Office
Contact: 8087706100/ Computer Lab
Registration started
Venue: Computer Lab, V. K. Mate Highschool

Priyadarshani
SCHOOL & JR. COLLEGE
ALANDI

# 2025-26 ADMISSIONS OPEN

## PRIYADARSHANI
SCHOOL, ALANDI

**42** YEARS OF ENRICHING EXPERIENCE IN EDUCATION

**50** FIFTY PLUS NATIONAL & INTERNATIONAL AWARDS ACROSS SCHOOLS

Contact Us Now

**86687 55826**

**98232 31705**

Wadgoan road, Sr.no. 98,
Opposite Ram Mandir,
Alandi 412105




Late Babanrao Gabaji Gawali Charitable Trust's
SPG INTERNATIONAL PUBLIC SCHOOL & JUNIOR COLLEGE
SPG INTERNATIONAL PUBLIC SCHOOL & JR. COLLEGE
WE MAKE YOUR FUTURE
Powered by
JAI HIND EDUTECH
CBSE Affiliation No. : 1130741 • UDISE Code - 27252001012
BHOSARI CAMPUS : Sr. No. 203, Nr. Durwankur Lawns, Alandi Road, Bhosari, Pune-411039 (Maharashtra)
SPG INTERNATIONAL PUBLIC SCHOOL
Pre Primary to Class XII
LIMITED SEATS
Hurry up!!!
ADMISSION
OPEN
2025-2026
Bi-focal / Technical / Vocational Subject are available
For Science Stream
Computer Science
Crop Science
Electronics
Mechanical / Technical Automobile
Information Technology (IT)
For Commerce Stream
Banking
Marketing & Sales
Office Management
Small Industries & Self employment
Information Technology (IT)
CALL NOW : 9763441639 / 8657473241

KAMALA EDUCATION SOCIETY'S

# PRATIBHA INSTITUTE OF BUSINESS MANAGEMENT

KAMALA Education Society

**AICTE Permanent ID: 1-3675161 | DTE Code: 6167**

Approved by AICTE | B+ NAAC Accredited | Permanently Affiliated to Savitribai Phule Pune University

## ADMISSIONS OPEN

Full Time Undergraduate Courses (3 Years Degree Course, 4 Years Honours)



**BBA**

**Bachelor of Business Administration**



**BCA**

**Bachelor of Computer Applications**

### Highlights:

- Advanced Industrial and Research Learning
- Proven Track Record of Placements
- Mentoring and Seed Funds for Startups
- Skill Development and Certification Courses
- Live Industrial Projects
- Earn and Learn Scheme of Rs. 10,00,000+
- Govt. and Management Scholarships
- State of the Art infrastructure
- ICT enabled classrooms

Eligibility: Passed HSC Examination with any stream

**Call for more details:**

**BBA : Prof. Gururaj - 8624991767 | Dr. Pallavi - 9225635556**

**BCA : Prof. Manish - 9823223336 | Prof. Surabhi - 9049004895**

www.pibmpune.org.in

Scan QR code to know more


MASTER MIND GLOBAL
SCHOOL & Jr. College
(CBSE)
( Since 2013)
ADMISSIONS
OPEN FOR
NURSERY TO 12TH
Where There is
Creativity, There is
Master Mind
Excellence in Education & Disciplined Environment
Co-Curricular & Extra Curricular Activities
Guaranteed Safety & Security
7
STAR
RANKING
A++ Grade
In Leadership & Quality
Management
Contact : +91 7218125125
E-mail : mastermindglobalschool.com
Website : www.http://mastermindglobalschool.com